# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविम./माध्य.परीक्षा/ 2946
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक -२६/०२/२०२२

.प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व
उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :- सन २०२१-२२ या वर्षात परीक्षा देणाऱ्या इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देणेबाबत.**

संदर्भ :-१.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७ एसडी-२, मंत्रालय, मुंबई -३२ यांचे दि.२१/०२/२०२२ चे पत्र
२.राज्यमंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/१०२६ दि.२२/०२/२०२२ चे पत्र
३. या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/२२८९ दि.०५/०१/२०२२ चे परिपत्रक
४. या कार्यालयाचे क्र.कोविमं/उ.माध्य.मार्च २०२२/२२८४ दि.०४/०१/२०२२ चे परिपत्रक

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे आयोजन अनुक्रमे दि.१५/०३/२०२२ ते दि.०४/०४/२०२२ व दि.०४/०३/२०२२ ते दि.०७/०४/२०२२ या कालावधीत करण्यात आलेले आहे. कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७ एसडी-२, दि.२१/०२/२०२२ अन्वये सन २०२१-२२ या वर्षात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ.७वी व इ.८वी मध्ये सदर विद्यार्थ्यांचा **क्रीडा स्पर्धेतील सहभाग** विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करिता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत.

तसेच सन २०२१-२२ या वर्षात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इ.१२वी पूर्वी इ.९वी व इ.१०वी मधील विद्यार्थ्यांचा **क्रीडा स्पर्धेतील सहभाग** विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करिता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत. तसचे सदर सवलत ही **केवळ सन २०२१-२२ च्या परीक्षेकरिताच देय राहिल** असे शासनाने कळविलेले आहे.

तरी आपल्या माध्यमिक शाळेतील अथवा उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थ्यांचे परिपुर्ण प्रस्ताव आपल्या कार्यक्षेत्रातील क्रीडाधिकारी यांच्याकडे संदर्भीय पत्र क्र.०३ व ०४ च्या पत्रान्वये कळविलेल्या निर्धारित तारखेस पाठविण्यात यावेत.

**(सत्यवान सोनवणे),**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रत - सर्व क्रीडाधिकारी, सातारा/सांगली/ कोल्हापूर

**महाराष्ट्र शासन**


शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, दुसरा मजला
राजगुरु चौक, मादाम कामा
मार्ग, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

ई-मेल :- sd2.sesd-mh@gov.in


क्रमांक :- संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१७/एसडीर-    दिनांक :- २१ फेब्रुवारी, २०२२

प्रति,

सचिव,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक

शिक्षण मंडळ, पुणे

विषय :- सन २०२१-२२ या वर्षात परीक्षा देणाऱ्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्याबाबत.

संदर्भ:- आयुक्त क्रीडा यांचे पत्र क्र.क्रीयुसे/क्रीगुस/प्रस्ताव/२१-२२/का-४, दि.१९.०१.२०२२.

आपल्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कोविड-१९ या रोगामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे सन २०२१-२२ या वर्षात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इयत्ता ७ वी व इयत्ता ८ वी मध्ये सदर विद्यार्थ्यांचा क्रीडास्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करिता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत.

तसेच सन २०२१-२२ या वर्षात इयत्ता १२ वी परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या बाबतीत इयत्ता १२ वी पूर्वी इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी मधील विद्यार्थ्यांचा क्रीडास्पर्धेतील सहभाग विचारात घेण्यात यावा व सदर विद्यार्थ्यास सन २०२१-२२ करीता सवलतीचे क्रीडा गुण देण्यात यावेत.

सदर सवलत ही केवळ सन २०२१-२२ च्या परीक्षेकरिताच देण्यात येत आहे.

(इ.मु.काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१)आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे

२)उपसचिव (क्रीडा), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.    निवडनस्ति